दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)



24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड



छत्रपती संभाजीनगर || वर्ष २ रे || अंक २३१ || मंगळवार ०६ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||


## विकासाच्या नावाखाली जनतेची लूट..कंत्राटदार मात्र खुश...!

सेलू प्रतिनिधी

एकीकडे विकसित महाराष्ट्र प्रबळ,महाराष्ट्र करण्यासाठी सरकार जोराने काम करत आहे. प्रत्येक कंत्राटदार मात्र स्वतःचे खिसे भरत आहेत आणि जनतेसाठी आलेल्या पैशाची लुटा लूट करत आहेत. असाच एक प्रकार सेलू येथे घडला मैदानासाठी तार कुंपण करण्याचा निधी मंजूर झाला. लाखो रुपयांचा निधी येऊनही पहावे तसे पूर्ण तिचा उपयोग झाला असे काही दिसत नाही. चारी बाजूने तार कुंपण करण्यासाठी आलेला निधी मात्र चारी बाजूने कुंपण उघडेच असाच रित्या तार कुंपणाचे चे काम पूर्ण केल्या गेले आहे. मंदिरासाठी आलेल्या निधी चा एवढा भ्रष्टाचार खुलेआम होत आहे अशी चर्चा नागरिकांमध्ये पसरत आहे अशा खुलेआम भ्रष्टाचार करणाऱ्या



शहराला कोट्यावधी रुपयांमध्ये निधी प्राप्त करून देत आहे. छोट्या छोट्या कामाकडे लक्ष देत आहे, परंतु ह्याचाच फायदा घेत काही आहे..ङ्कप्रभाग क्रमांक १० आत्रे नगर सेलू येथील हनुमान मंदिरासाठी आलेला निधी अनेक वर्षापासून मंदिराच्या खुल्या असलेल्या कंत्राटदाराची १००% मधला किती निधी कामासाठी लावला अशी सखोल चौकशी करणार कोणी वाली उरलाच नाही असे दिसून येत आहे..

## हुतात्मा अनंता लेवडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सेलू रोहित झोल

सेलू दि ५ ऑगस्ट सोमवार रोजी तालूक्यातील डिग्रस वाडी येथील मराठा आंदोलक अंनत सुंदरराव लेवडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त बलिदान दिवस साजरा करण्यात आला. हुतात्मा अनंत लेवडे यांच्या परभणी रोड वरील स्मारकास व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



यावेळी दत्ता सोळंके ,ह.भ.प. प्रसाद महाराज काष्टे, पांडुरंग कदम ,सामाजिक कार्यकर्ते सुनील गायकवाड,निर्मिक क्लासेस संचालक शुकाचार्य शिंदे, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ङ्कमराठा समाजला आरक्षण मिळावे म्हणून मराठा आंदोलनात अनंत लेवडे यांनी ५ ऑगस्ट २०१८ रोजी बलिदान दिले आणि आज मनोज दादा जरांगे यांचे आंदोलन सुरू असून मराठा आरक्षण आंदोलनात ज्या समाज बांधवांनी बलिदान दिले आहे, तरी या सरकारकडून आम्हाला अपेक्षित आहे की मराठा समाजातील युवकांचे बलिदान वाया जाउ देऊ नये. तसेच हुतात्मा अनंत सुंदराव लेवडे स्मृतिदिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाडी येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

या वेळी भगवान यादव सुरेंद्र इंगोले, गुलाब महाराज गाडेकर, बाळकृष्ण लेवडे, सुंदर महाराज लेवडे, ज्ञानेश्वर लेवडे , संतोष निर्वळ , बाबासाहेब निर्वळ, गणेश निर्वळ , महादेव होगे, मोहन यादव, माणिक होगे, प्रल्हाद लेवडे , नारायण परभने, अंजीराम गायकवाड , प्रल्हाद लेवडे, मुंजा लेवडे, अशोक लेवडे, माणिक होगे, अंकुश होगे, पवन नाईक, मोहन आठवले, प्रकाश सोनवणे, ङ्कसुधाकर गाडेकर, पिंटू शेरे, पांडुरंग गायकवाड आदी समाज बांधव उपस्थित होते.

## अवैध धंद्यावाल्या विरुद्ध नव्याने आलेल्या किरण बिडवे साहेबांनी उघडलेली मोहीम अभिनंदनिय!

भोकरदन प्रतिनिधी

सद्दाम मिर्झा

नव्याने रुजू झालेले भोकरदन पोलीस स्टेशनचे पीआय यांनी अवैध धंदे,गुटखा माफिया, वाळू माफिया यांच्या विरुद्ध दमदार कार्यवाही सुरू केल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. नव्याने रुजू झालेल्या भोकरदन पोलीस स्टेशनचे पोलीस इन्स्पेक्टर श्री किरण बिडवे यांनी अवैध धंदेवाल्यांच्या विरुद्ध दमदार कारवाई सुरू केलेली आहे. त्यामुळे भोकरदनच्या जनतेची समाजसेवकांची अनेक वर्षा पासून अवैध धंद्याला आळा घालण्याची मागणी पूर्ण होताना दिसत आहे. काही लोकांचे म्हणणे नव्याचे नऊ दिवस निघून जातील साहेब पूर्वीच्या अधिकाऱ्या प्रमाणे पुन्हा काम करतील परंतु तसे मात्र वाटत नाही कारण त्यांचे कार्यवाही अतिशय दमदारपणे सुरू झालेली आहे. त्याचा परिणाम म्हणून बिगर नंबर प्लेटच्या वाळू वाहणाऱ्या गाड्या दिसेनाशा झाल्या आहेत. सट्टा वाले मटक्यावाले जाम घाबरलेले



आहेत.भोकरदन मध्ये अवैध गर्भपाताचे प्रकरण पूर्ण राज्यात गाजले औरंगाबादच्या टीमने येऊन त्यांच्यावर कारवाई केली परंतु भोकरदनच्या पोलीस स्टेशन मार्फत कारवाई करण्यात आली नव्हती ही सुद्धा जनतेमध्ये चर्चा करताना लोक आढळून येत आहेत. करताना ढवळून येत आहेत. परवानगी नसताना अनेक लोक चोरट्या मार्गाने दारू आणतात आणि दारू विकतात आणि खेड्या पाड्यांमध्ये हा धंदा राजरोस चालत आहे. त्यामुळे अनेक तरुणांचे संसार उद्ध्वस्त झालेले आहेत अनेकांचे लेकर बाळ उन्हात पडलेले आहेत. आता मात्र या सर्वांचे धाबे दनाणले आहेत. राज्यामध्ये गुटखा बंद असताना गुटखा येतो कुठून लहान मोठ्या दुकानांवर गुटखा विकला जात होता. परंतु बिडवे साहेबांनी मोहीम उघडल्यामुळे या सर्वांच्या गँग मध्ये धावपळ सुरू झाली असून लपाछपी सुरू झालेली आहे. लवकरच मोठ्या अड्यावर कार्यवाही होईल आणि मोठी मासे गळाला लागतील व त्यांच्यावर कायदेशीर कार्य होईल असे शहरामध्ये बोलल्या जात आहे. तसे झाल्यास किरण बिडवे साहेब यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव नक्कीच होईल. त्यांच्या या कामाला शहरातील आणि तालुक्यातील चांगल्या लोकांचा नक्कीच पाठिंबा मिळेल.

## केंद्रीय अर्थसंकल्पात शेतकरी, तरुण, मध्यमवर्ग, महिला आणि लघु उद्योगांना मोठा दिलासा : सीए समीर बाकरे , भाजप प्रवक्ते.

दैनिक सूर्योदय

निश्चल येनोरकर

केंद्रीय अर्थसंकल्पाने अनेक महत्त्वाच्या योजना आणल्या आहेत आणि कृषी, तरुण, मध्यमवर्ग, महिला आणि लघु उद्योगांवर भर दिला आहे असे अर्थसंकल्पावर पत्रकार परिषदेत बोलताना समीर बाकरे म्हणाले. ते पुढे म्हणाले की, सरकारने आता तरुणांचे कौशल्य आणि लघु आणि मध्यम उद्योगांना बँक पतपुरवठा करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. केंद्र सरकारचा महसूल आणि खर्चही त्यांनी विशद केला. ते म्हणाले की, सरकारने मोठ्या प्रमाणात इंफ्रास्ट्रक्चर साठी ११.०० लाख कोटी ची तरतूद केली आहे. ते म्हणाले की भारतीय अर्थव्यवस्था आता देशांतर्गत मागणी आणि पायाभूत गुंतवणुकीद्वारे प्रचंड प्रमाणात वाढेल. वाढवण बंदर ७६००० कोटी, विदर्भासाठी ६०० कोटी रुपयांची दुष्काळी मदत, मेट्रो, गावातील रस्ते, हाऊसिंग आदींसह महाराष्ट्रासाठी केलेल्या वाटपाचीही त्यांनी सविस्तर माहिती दिली. ङ्ककेंद्रीय योजनांमध्ये महाराष्ट्राला नेहमीच सर्वाधिक वाटा मिळाला असून विरोधक अर्थसंकल्पाच्या विरोधात खोटं पसरवत असल्याचेही ते म्हणाले. ङ्कवित्तीय तूट आणि महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारचे वित्तीय व्यवस्थापनही त्यांनी स्पष्ट केले. शिक्षण क्षेत्रासाठी वाटपाच्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, वाटप जरी टक्केवारी मध्ये कमी असला तरी मागील वर्षा पेक्षा तो वाढून १.२५ लाख कोटी रुपये झाला आहे. ते म्हणाले की, एक मोठा भाग कौशल्यासाठी देखील समर्पित आहे, ज्याचा देखील शिक्षणाचा भाग म्हणून विचार केला पाहिजे. भांडवली नफ्यातील बदलांमुळे बहुसंख्य मध्यमवर्गीयांना फायदा होईल, असेही ते म्हणाले. ते म्हणाले की, सरकार शेती सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करत असून १ कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी मदत केली जाईल. छोट्या उद्योगांसाठी सिडबी बैंक अजुन विशेष शाखा उघडणार आहे. ते पुढे म्हणाले की एनडीए सरकार ने मागील दहा वर्षात शौचालय, घर, बिजली, ग्रामीण रस्ते अशे लोकांचें मूलभूत प्रश्न मार्गी लावून आता अर्थव्यस्थेसाठी भक्कम पाया तयार केला आहे.ङ्क पत्रकार परिषदेला , भाजपा वरिष्ठ नेते उल्हास फडके , जिल्हा महामंत्री आशु गोंडाने , भंडारा शहर अध्यक्ष सचिन कुंभळकर , रब्बी चड्ढा , प्रशांत निंबोलकर उपस्थित होते

## मग्रारोहयो कंत्राटी कर्मचाऱ्यांला शासकीय सेवेत कायम करा

**शासकीय सेवेत रुजू करण्यासंबधी विधान परिषद सदस्य परिणय फुके यांना निवेदन**

दैनिक सूर्योदय

खूशाल भूरे लाखनी:- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करणारा इतर पदावरील कंत्राटी सेवा पुरवण्याऱ्या अशासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायमस्वरूपी करण्यासंबंधी (ता.४) रोज रविवारला मा.परिणय फुके विधान परिषद सदस्य महाराष्ट्र यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की,शासन निर्णय क्र. बैठक २८२३/ प्र.क्र. ४३०/ आरोग्य-७ सार्वजनिक आरोग्य विभाग दि.१८ मार्च २०२४ नुसार राष्ट्रीय ग्रामिण रोजुगार हमी योजनामधील विविध पदावर काम करणारे कंत्राटी कर्मचारी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी, समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, लिपीक तथा डेटा एंट्री ऑपरेटर यांना आरोग्य विभाग वा इतर विभागातील कर्मचा-यांप्रमाणे शासन सेवेत कायम समावून घेण्यात यावे करीता निवेदन देण्यात आले.सदर योजनेंतर्गत ग्रामपंचायत पातळीवरील नोंदणीकृत मजुरांना



अकुशल कामे उपलब्ध करुन देणे व त्यामाध्यमातुन ग्रामपंचायत स्तरावर स्थावर मालमत्ता निर्मीती करणेस्तव आम्ही कंत्राटी कर्मचारी आम्हास सोपविण्यात आलेली जबाबदारी व वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन करुन कर्तव्य पार पाडीत आहोत. सदर योजनेची आम्ही मागील १५ वर्षाहून अधिक कालावधीपासून अंमलबजावणी करीत आहोत. परंतु मागील १५ वर्षाहून अधिक कालावधीपासून सदरील योजनेंतर्गत कार्यरत असतांना देखील आम्हा कंत्राटी कर्मचारी यांना शास्वत नौकरीची हमी नाही. ही बाव अत्यंत खेदजनक आहे, तरी आरोग्य विभागाच्या१८ मार्च २०२४ संदर्भीय शासन निर्णयानुसार आरोग्य विभागातील १० वर्ष पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचारी यांना शासन सेवेत सामावून घेण्याची प्रशासकीय कार्यवाही पूर्ण केली आहे. त्यानुसार मग्रारोहयो कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करावे ही मागणी निवेदनात केली आहे या वाढत्या महागाईच्या काळात कौटुंबिक जबाबदारी सांभाळणे, मुलांचे शिक्षण, वयोवृध्द आई-वडील यांचे आजारपणात औषधोपचार अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने कृपया आमच्या निवेदनाचे सहानुभुतीपूर्वक विचार करुन उपरोक्त नमुद कंत्राटी तत्वावरील कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करणेस्तव शासन स्तरावर शिफारस करुन कंत्राटी कर्मचारी यांना कायम करणेबाबत प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करणेबाबत मा.परिणय फुके विधान परिषद सदस्य यांनी पाठपुरावा करण्याची विनंती करण्यात आली तेव्हा मा.गिरीश बावनकुळे उपसभापती पं. स.लाखनी उपस्थित होते.निवेदन देतेवेळी लाखनी पंचायत समिती येथील रोजगार हमी विभागातील कंत्राटी कर्मचारी सहायक कार्यक्रम अधिकारी राहुल गिर्हेपुंजे,कार्यक्रम व्यवस्थापक महेंद्र साखरे,एम.आय.एस.समनव्यक रामेन्द्र लाडे,तांत्रिक अधिकारी महेश बर्वे, आनंद वाघाये,गिरीधर मेश्राम यांची उपस्थिती होती.

संपादकीय

## मानसिक ताणांना सामोर जावे

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात सुख-दुःखाचे, आनंदाचे, शौर्यातीत पराक्रमाचे लहान-मोठे असे प्रसंग वारंवार घडत असतात. वर्षाचे तीन ऋतू, बारा महिने आणि अधिक मास यामधले जीवनचक्र गतिमान होते, ते जगण्याच्या धावपळीत अन्नधान्य, निवारा शोधण्यासाठी बाहेर पडलेल्या मुंबईकरांमुळे. एक पाय घरात आणि एक पाय बाहेर असलेल्या प्रत्येकावर कसली ना कसली टांगती तलवार असते. संध्याकाळ होईस्तोवर आपला माणूस व्यवस्थित घरी यायला हवा, ही घरच्यांना लागून राहिलेली चिंता माणसाला स्वस्थ बसू देत नाही. सदान्-कदा प्रश्नांच्या गर्तेत अडकलेल्यांना मानसिक, शारीरिक प्रकारच्या ताणांना सामोर जावे लागते. ताण निर्माण करणाऱ्या बऱ्याचशा गोष्टी आपल्या आसपास घडत असतात. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे सतत बदलत असलेली आपली जीवनशैली. मानवी जीवन क्षणभंगुर असल्याने, सुखाच्या हव्यासापोटी दैनंदिन जीवनातल्या गरजांसाठी आपण आपला आनंद आणि सुखी जीवन दुःखाच्या अथांग सागरात लोटतो. मनुष्याच्या जगण्याच्या विविध तऱ्हा असल्याने, त्यानुसार तो त्याच्या पद्धतीने जीवनाचा आनंद घेतो. या आनंदात आहार, विहार, निद्रा यांवर परिणाम होऊन समतोल मात्र बिघडतो.

पाऊस, पाणी, प्रदूषण, रोगराई, आजार, कडक उन्हाळा या विषयांवर 'मुंबईचे आरोग्य धोक्यात' या मथळयाखाली एक बातमी कानावर आली. त्यानिमित्तानेच पार पडलेल्या एका डॉक्टरी सभेच्या आयोजनात मला हजर राहण्याचा योग आला. आनंदीत राहा आणि दीर्घायुषी व्हा या विषयावरील परिसंवादात मनाला आणि एकूणच शरीराला चकटफू आरोग्य मंत्र मिळताच, आनंदाच्या गुरुकिल्लीची गोष्ट आठवत माझे विचारचक्र सुरू झाले.

तसं तर, जगातली निम्म्याहून अधिक माणसे मनावर ओझे घेऊन जगतात. अहो स्मितहास्य तर सोडाचं, पण रस्त्यावर भेटलेल्या ओळखीच्या माणसाची ओळख आठवेपर्यंत आपण ती विसरतो! हे असं होत बघा! मंडळी मनुष्य ज्यामुळे जास्त आनंदी होतो, त्यात सुधारणा झाली, तर आनंदी आनंद चोहीकडे पसरेल. या आनंद लहरी तरंगत येतील हवेतून. त्यावेळी ज्यांच्या जाणिवा-जागृती कार्यक्षम असतील, त्यावेळी त्यांना आनंदाची कमतरता भासणार नाही. दुःखाचे डोंगर आडवे आले, तरी हर्षल वायू लहरी वाहतील. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंत:करणात असतो. तो ज्याला कळतो, त्याच्या आयुष्याचे सोने होते. बाबा आमटे यांच्या आनंदवनाची संकल्पना ही दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी आनंदाची पायमल्ली ठरलीयं. समाजातले अनेक घटक, सामाजिक संस्था, समाजसेवक आपल्यापरीने आनंदाचे साम्राज्य पसरवण्यासाठी हातात हात घालून उभे आहेत. त्यांच्या वाट्याला दुःखद प्रसंग आले असतीलच! त्यातून तावून सुलाखून निघाल्यावरचं त्यांचे कार्य जगासमोर आल असणार. म्हटलं तर सत्यवचन ही आनंदाची खूण आहे.

विवेकी धोरणामुळे आनंदाला बळकटी प्राप्त होते. त्यासाठी दिलेला सहयोग चिरकाल आनंद देतो. आपल्याकडे म्हणजे समाजात आनंदाच्या व्याख्या व्यक्तीगणिक बदलतात. कधी कुणाला खाण्यात आनंद मिळतो. कुणाला देण्यात आनंद मिळतो, तर नवीन गोष्टी घेण्यात काही धन्यता मानतात. काही अवलियावीर अनोख्या अशा विक्रमाचे सरदार बनतात. शेजारच्या सुमन काकी पलीकडच्या दादरकर काकूंना बडबडण्यात तोंडसुख घेतात. मित्र रमेश सुरेशच्या चांगल्या गोष्टींना नाव ठेवण्यात वेळ दवडतो. बंड्याकडे सायकल जाऊन स्कूटर आलीयं, हा त्याचा आनंद तर गुर्जर काकांच्या बढतीसह बदलीचे आनंदी वारे वाहत आहेत, हा त्यांचा आनंद. आनंदाला जसे बांधून ठेवता येत नाही, तसेच तो कवेतही घेता येत नाही. क्षणभर आनंदासाठी लोकं आपला पैसा-वेळ खर्च करतात. दोन पैशाचा आणि बिन पैशाचा आनंद हा भाग अजून वेगळा असतो. आपल्या आनंदासाठी प्रयत्न करण्यापेक्षा दुसऱ्याला काय दिले तर सौख्य मिळेल, याचा विचार हवा.आपल्याकडच्या काही गोष्टी समोरच्याला दिल्याने शांतता अनुभवास येते. शिवाय त्यांच आयुष्य उजळून निघत हे विशेष. मंडळी आनंद असा सुगंध आहे की, तो दुसऱ्यावर शिंपित जाता स्वतःवरही शिंपला जातो. मग मस्त आहे ना, हा बिनखर्चाचा स्प्रे. म्हणजे बघा, आनंद शोधू जाता दडून बसतो, पकडू जाता निसटतो, आणि त्याच्यामागे धावू लागताचं हुलकावणी देतो, पण जर त्याला सहजपणे घ्यालं, तर सहज प्राप्त होतो. त्यासाठी थोरामोठ्यांची शिकवण वेळोवेळी उपयोगाला येते. आपल्याला बाळकडू पाजण्याचे काम त्यांच्याकडून वारंवार होते म्हणून तर समाजात आनंद नांदतो.

# सावधान....सुधागडवाशी यांना बिबट्यापासून सावधानतेचा इशारा व खबरदारीचे उपाय

सुधागड ता. वनपरिक्षेत्र अधिकारी-अश्विनी तरसेङ्गसुधागड ता. वन परिक्षेत्र अधिकारी वन्यजीव-विकास तरसे

रायगड जिल्हा

उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

सुधागड तालुक्यात घोटावडे, मानखोरा विभागात बिबट्याचे वावर सुरू असल्याचे स्थानिक लोकांकडून तक्रारी वन विभागाकडे आल्याने या परिसरात सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. याबाबत तात्काळ दखल घेऊन तालुका ता. वनपरिक्षेत्र अधिकारी अश्विनी तरसे मॅडम तसेच वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी विकास तरसे यांनी घटनास्थळी भेट देऊन सदर विषयाची माहिती घेतली असता. ग्रामस्थांकडून सांगण्यात आले की, या परिसरात बिबट्या फिरत आहे. त्यामुळे आमच्या गुरेढोरांना धोका आहे. याबाबत दखल घेऊन उपायोजना गेले चार दिवसापासून चालू केली आहे. मॅडम स्वतः गेले चार दिवसापासून या विभागात दिवसा व रात्री चार राऊंड मारत आहेत. तसेच वनपाल व वनरक्षक यांची टीम या विभागात गस्त घालण्यासाठी कार्यरत ठेवली असून रात्री बिबट्या गावात येऊन म्हणून आपल्या वनरक्षकांकडे फटाके देऊन परिसराच्या आजूबाजूला रात्री १०,११,१२ दरम्यान फटाके वाजवण्याचा आदेश दिला आहे. ये ना करून बिबट्या शिकारीसाठी गावात न येता लांब पळून जाईल त्यासाठी ही उपाययोजना करण्यात आली आहे. तसेच कर्तव्यदक्ष अधिकारी तरसे मॅडम स्वतः हा पायी जंगलात फिरत आहेत. या अगोदरही मॅडम ऊन पावसाची परवा न करता वनविभागाची नुकसानी होऊ नये यासाठी खबरदारी म्हणून पायी जंगलात फिरतात. त्यामुळे सुधागड वाशियांकडून मॅडमचे नेहमीच आभार मानले जातात. आताही बिबट्याच्या वापरामुळे भयभीत झालेल्या ग्रामस्थांसाठी या विभागात खबरदारीचे उपाय म्हणून चालू केले आहे. घाबरू नका आम्ही तुमच्याबरोबर आहोत असा ग्रामस्थांना धीर दिला. खबरदारीचे उपाय म्हणून रात्री घराबाहेर पडू नका, आवश्यक असल्यास गटा गटांनी हातात काठी बॅटरी घेऊन तुम्ही, रात्री कुत्रे जोर जोराने भुंकत असल्यास बिबट्या जवळ असण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. शेळ्या, मेंढ्या, गाय म्हैस, कोंबड्या बंद गोठ्यात ठेवाव्यात, बिबट्या सहसा जाणीवपूर्वक माणसावर हल्ला करत नाही. बिबट्याला हकालण्यासाठी त्याला दगड मारू नये व त्याचा पाठलाग करू नये ते आपणास धोकेदायक ठरू शकते, बिबट्या आल्यास भांडी वाजवा, फटाके वाजवा, जोर जोराने आरडा ओरड करा, घराच्या बाजूने रात्रीच्या वेळी लाईट चालू ठेवावी, बिबट्या हा अन्नसाखळीतील महत्त्वाचा घटक आहे. त्याचे अस्तित्व कमी झाले तर अन्नसाखळीतील इतर प्राण्यांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. बिबट्या हा अनुसूची एक मधील वन्य प्राणी असल्याने या वन्य प्राण्यास शिकार करणे किंवा इजा करणे किंवा शिकारीचा प्रयत्न करणे हा वन्य जीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील कलम ९ अन्वये गुन्हा आहे. बिबट्या आपल्या विभागात वावरत असल्याने आपल्यावर बिबट्याचा हल्ला होऊ नये म्हणून वरील नियमांचे पालन करून काळजी घ्यावी अशा सूचना अधिकाऱ्यांकडून ग्रामस्थांना खबरदारी उपाय म्हणून सुधागड तालुका वन परिक्षेत्र अधिकारी अश्विनी मॅडम व वन्यजीव परिक्षेत्र अधिकारी विकास तरसे यांच्याकडून देण्यात आल्या आहेत. तसेच स्पीकरद्वारे अलाउन्समेंट ही रोज करण्यात येत आहे. काही संशय आल्यास वन विभाग हेल्पलाइन क्र.१९२६ ला संपर्क करावे या वनपाल घोटावडे ९६६७९६१२२९ वनरक्षक ७०३९०८१५२४/७७१००५४०२४ या क्रमांकासी संपर्क करावे. तसेच अश्विनी तरसे मॅडम स्वतः हा जंगलातून फेरफटका मारत असल्याने अवैध लाकूडतोड व्यवसायिकांची धाबे दणाणले आहेत. जंगल संपत्तीची नुकसानी म्हणजेच राष्ट्राची नुकसानी ही होऊ नये म्हणून मॅडम आपल्या कर्तव्यासी ठाम असल्याने अवैध लाकूडतोडांवर दहशत निर्माण झाली आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे तीन तेरा वाजले आहेत. यामुळे ही आणि बिबट्या आल्यानंतर स्वतः हा तात्काळ उपायोजना केल्यामुळे जनतेकडून मॅडम बद्दल कौतुक व्यक्त केले जात आहे.




# विरसई येथे रानभाज्या प्रदर्शन व पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न

दापोली : कृषी महाविद्यालय, दापोलीतील ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रम (रावे) अंतर्गत कार्यरत असलेल्या विद्यार्थिनींच्या ''वसुंधरा'' व ''कृषिनित्या'' गटाने विरेश्वर विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या साहाय्याने दापोली तालुक्यातील विरसई गावात रानभाज्या प्रदर्शन व पाककला स्पर्धांचे आयोजन केले होते.

विरेश्वर विद्यालयाच्या सभागृहामध्ये औपचारिक कार्यक्रम पार पडला. यावेळी व्यासपिठावर कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण झगडे,महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक विनोद म्हस्के, कृषी सहाय्यक स्नेहल रहाटे, तलाठी अक्षय पाटील , तलाठी प्रमोद कैकाडी, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिलकुमार गोरीवले, अनिल पिंपळकर, प्राथमिक शिक्षक विनय राणे, अनिकेत तटकरे, मानसी राणे, सुनिता जाधव, सुनिल राणे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध प्रकारच्या एकूण ४६ रानभाज्यांची ओळख व त्याची सविस्तर माहिती, औषधी गुणधर्म भित्तीपत्रकद्वारे करून देण्यात आली. तसेच रानभाज्यांपासून पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ज्या मध्ये एकूण १४ स्पर्धकांनी सहभाग दर्शवला.



या स्पर्धेसाठी कृषी पर्यवेक्षक विनोद म्हस्के , तलाठी अक्षय पाटील व प्रमोद कैकाडी तसेच कृषी सहाय्यक स्नेहल रहाटे हे परीक्षक म्हणून लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया चौगुले हिने केले.

या प्रदर्शनामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांकडून रानभाज्यांबद्दल माहिती सांगण्यात आली. उत्कृष्ट माहिती सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे ३ क्रमांक काढण्यात आले.

त्यामधे तन्वी राणे (प्रथम), करीना तटकरे (द्वितीय), केतकी तांबुटकर (तृतीय) क्रमांक पटकावला. तसेच पाककला स्पर्धेमध्ये रिया पाटील(प्रथम), हर्षदा राणे (द्वितीय),ङ्गमानसी राणे (तृतीय) क्रमांक पटकावला. कार्यक्रमा दरम्यान विजेत्यांचे मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. प्रदर्शन बघण्यासाठी जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक मराठी शाळा विरसई मधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी तसेच शेतकरी व महिला वर्गाने हजेरी लावली.

या कार्यक्रमासाठी विरेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनीलकुमार गोरीवले व प्राथमिक शिक्षक विनय राणे यांचे तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या आयोजना साठी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मकरंद जोशी, कार्यक्रम समन्वयक डॉ. आनंद मयेकर, केंद्र प्रमुख डॉ. जगदीश कदम, कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण झगडे, डॉ. मंदार पुरी, डॉ. आशिष शिगवण, डॉ. रणजीत महाडिक यांचे मार्गदर्शन लाभले.

## विद्यामंदिर मांडा शाळेतील,अनागोंदी कारभारा विरोधात शिवसेनेचे उपोषण- शिवसेनेचे - उपशहर प्रमुख विजय देशेकर

दै. सूर्योदय

कल्याण,(प्रतिनिधी):

छत्रपती शिक्षण मंडळ संस्थेचे ब्रिद मागेल त्याला शिक्षण असे असलेल्यांची संस्थेने जेथे जेथे शिक्षणाची गरज होती. तेथे तेथे पाऊल टाकून शिक्षणापासून वंचित असलेल्यांची शैक्षणिक प्रयत्न.मात्र काही अनागोंदी - कारभार उघडकीस समोर आल्याचे दिसून येत आहे. विद्यामंदिर मांडा शाळेत जवळ पास १९०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.ङ्गङ्गछत्रपती शिक्षण मंडळ संचालित विद्यामंदिर - मांडा शाळेतील अनागोंदी - कारभाराविरोधात शिवसेनेचे - उपशहर प्रमुख विजय देशेकर - यांच्या पुढाकाराने मंगळवारी ६ ऑगस्ट रोजी एकदिवसीय - लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.ङ्गङ्गशिवसेना उपशहर प्रमुख विजय -देशेकर यांनी विद्यामंदिर मांडा या शाळेतील गैरप्रकाराबद्दल शाळेच्या मुख्याध्यापकांना ३ जुलै ला लेखी निवेदन दिले होते. - त्यावर उत्तर न आल्याने १९ जुलै रोजी स्मरणपत्र सुध्दा दिले. परंतुङ्गशाळेकडून दिशाभूल करण्याचे उत्तर आल्याने १२ जुलै रोजी दिलेल्या निवेदनात १८ जुलै रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करणार असल्याचे जाहिर केले असता, शाळेने १६ जुलैच्या लेखी विनंती आश्वासनाद्वारे माहिती देण्याकरीता दहा दिवसांची मुदतवाढ घेउनही कोणत्याही प्रकारची दखल न घेता उलटपक्षी सर्रासपणे गणवेश विकत आहेत व डोनेशनच्या नावाखाली इमारतङ्गनिधी न भरल्यास शाळेत प्रवेश दिले जाणार नाही अशाप्रकारे धमकीवजा इशारा विद्यार्थ्यांच्या मार्फत पालकांकडे देत आहेत. त्यामुळे या सर्व विषयांवर कायदेशीर लोकशाहीमार्गाने आवाज उठवण्यासाठी मंगळवार ६ ऑगस्ट रोजी विद्यामंदिर शाळेच्या बाहेर एकदिवसीय लाक्षणिक उपोषणाद्वारे प्रशासनाचे डोळे उघडे करण्याचे प्रयत्न करणार आहेत.असल्याचे विजय देशेकर यांनी सांगितले.

## राज्यात उभारली जाताहेत ५८२ संविधान मंदिरे, १५ ऑगस्टला एकाचवेळी उद्घाटन - लोढा

मुंबई : राज्यात सर्व ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व १६३ शासकीय तांत्रिक विद्यालयात संविधान मंदिरे उभारली जात आहेत. या मंदिरांचे १५ ऑगस्टला एकाचवेळी ऑनलाइन उद्घाटन होणार असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी शनिवारी पत्र परिषदेत दिली.

२६ जून या सामाजिक न्याय दिवसाचे औचित्य साधून संविधान मंदिरांची उभारणी करण्याचा निर्णय लोढा यांनी घेतला होता. या संविधान मंदिरात महिन्यातून एकदा विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम होतील. भारतीय राज्य घटनेतील तरतुदीबाबत कार्यशाळा होईल.

घटनात्मक अधिकार, कर्तव्यांबद्दल जागरूकता वाढण्यासाठी मोहीम आयोजित करणे, घटनात्मक समस्या, दुरुस्त्या, समकालीन समाजातील घटनेची भूमिका यासारख्या विषयांना घेऊन परिसंवाद, चर्चासत्र, आयोजित करणे, राज्यघटनेचे सखोल आकलन व्हावे, यासाठी निबंध स्पर्धा व संबंधित कार्यक्रम आयोजित करणे यासह संविधानाच्या विविध पैलूंवर पुस्तके, लेख आदी गोष्टी उपलब्ध करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडण्याचा उद्देश आहे, असे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

# व्हि. के. जाधव यांच्या निधनाने आंबेडकरी बहुजन चळवळीची मोठी हानी– आनंदराज आंबेडकर

**कोकण नेते व्हि. के. जाधव यांचा त्याग समर्पण जाणून कार्यकर्त्यांनी चळवळीत योगदान द्यावे – आनंदराज आंबेडकर**

पाली /बेणसे दि. (धम्मशील सावंत )आंबेडकरी बहुजन चळवळीतील धडाडीचे नेतृत्व कोकण नेते व्हि. के. जाधव यांनी आजन्म निस्वार्थी आणी स्वाभिमानी बाण्याने आपले जीवन समाज , राष्ट्र आणी देशहितासाठी समर्पित केले. बहुजन महापुरुष, महानायिका यांचे लढावू, क्रांतिकारी, परिवर्तन वादी विचार घराघरात तळागळात पोहचविण्याचे त्यांनी हयात भर काम केले. रिपब्लिकन नेत्यांना एकत्र करून ऐक्य घडवून आणण्यात ते यशस्वी ठरले. व्हि. के. जाधव यांचा त्याग समर्पण जाणून कार्यकर्त्यांनी चळवळीत योगदान द्यावे असे आवाहन रिपब्लिकन सरसेनेचे सरसेनानी तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांनी केले. ङ्गङ्गरिपब्लिकन चळवळीतील स्वाभिमानी नेते, ज्येष्ठ समाजसेवक, बहूजनांचे आधारवड असलेले नागोठणे येथील ज्येष्ठ कोकण नेते वसंत कृष्णा उर्फ व्हि. के. जाधव यांचे ७८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांचा पुण्यानुमोदन आणि श्रद्धांजली कार्यक्रम शांती दूत फार्म हाऊस वांगणी येथे पार पडला. यावेळी रायगड कोकणसह महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.ङ्गआंबेडकर पुढे म्हणाले की व्हि. के. जाधव हे ङ्गआंबेडकरी चळवळीतील पक्ष, धार्मिक संघटना, निळ्या झेंड्याशी ते सतत प्रामाणिक राहिले. हजारो तरुणांना आंबेडकरी चळवळीशी जोडून अन्याय अत्याचारा विरोधात लढण्याची त्यांनी प्रेरणा दिली.

अजातशत्रू म्हणून ओळख असलेले प्रेमळ आणि मनमिळावू स्वभावाचे व्हि. के. जाधव यांनी आंबेडकरी बहुजन चळवळीला ताकत देण्याचे काम केले. ते एक उत्तम संघटक होते, ते अनेकांचे मदतगार आणि आधारवड होते. आपल्या संघटन कौशल्याने त्यांनी अनेक जिवाभावाची माणसे जोडली. रिपब्लिकन ऐक्यात त्यांनी मुख्य भुमिका बजावत आंबेडकरी नेत्यांना एकत्र आणण्यात त्याकाळी त्यावेळी ते यशस्वी ठरले होते, यातच त्यांच्या कर्तृत्वाची उंची सामावली आहे. महाराष्ट्रात आंबेडकरी चळवळ, धम्म चळवळ वाढीसाठी त्यांनी तन मन धनाने योगदान दिले आहे, पुरोगामी आणी परिवर्तवादी चळवळ मजबूत व बलाढ्य होण्यात त्यांच मोठं योगदान राहिले आहे. अडीअडचणीत संकटात सापडलेल्या प्रत्येकाला त्यांनी मदतीचा हात दिलाय.व्हि. के. जाधव यांच्या निधनाने आंबेडकरी बहुजन चळवळीची मोठी हानी झाली असल्याचे आनंदराज आंबेडकर ङ्गयावेळी म्हणाले. लक्ष्मण भगत म्हणाले की व्हि. के. जाधव सामाजिक सलोखा ऐक्य बंधूत्व राखण्यात ते नेहमीच पुढाकार घेत. लोकशाही आणी संविधानाच्या



रक्षणासाठी व्हि. के. जाधव नेहमीच आग्रही आणी कृतिशील राहिले. आदिवासी, कष्टकरी, श्रमिक, गरीब गरजू बहूजणांची मुले शिकली पाहिजेत यासाठी त्यांनी सर्वोतोपरी योगदान दिले. सेवाभावी वृत्तीने ते हजारोच्या मदतीला धावून जातं असत. सर्वांच्या सुखदुःखात त्यांची हजेरी असायची. त्यांनी नेहमीच साधेपणा जपला, त्यांचा करारी बाणा पाहण्यासारखा होता. असे भगत म्हणाले.

वसंत केदारी म्हणाले की दिवंगत ङ्गव्हि. के. जाधव यांच्या रूपाने आंबेडकरी चळवळीतील कोहिनुर हिरा हरपला आहे. असे केदारी म्हणाले. के. के. गायकवाड म्हणाले की व्हि. के. जाधव राजकीय, सामाजिक चळवळीकरिता त्याग, समर्पण आणी दानशूर पणा जपणारे नेतृत्व काळाच्या पडद्या आड गेल्याने चळवळ पोरकी झाली आहे. आंबेडकरी बहुजन चळवळ जिवंत ठेऊन स्वाभिमानी कार्यकर्ते घडवणारे व्हि ङ्गके. जाधव यांच्या निधनाने एक ज्येष्ठ मार्गदर्शक हरपला असल्याची भावना पुण्यानुमोदन आणि श्रन्द्धांजली कार्यक्रमास उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरानी व्यक्त केली. ङ्गङ्गङ्गङ्गङ्ग यावेळी रिपब्लिकन सरसेनानी आनंदराज आंबेडकर, लक्ष्मण भगत, के. के. गायकवाड, दौलत जाधव, यशवंत गंगावणे, रघुनाथ साळवी, शांताराम गायकवाड, डी टी लोखंडे, चंद्रकांत गायकवाड, भगवान बिनेदार, संतोष गायकवाड, संजय जाधव, संध्या जाधव, रवींद्र मोरे, शिलानंद साळवी, संतोष कांबळे, महेंद्र मोरे, काशिनाथ कांबळे, भन्ते आदीच्छित्तो, भन्ते संघपाल, प्रा. सुनिल देवरे, राजेंद्र गायकवाड, शिवराम शिंदे, बाळासाहेब टके, सिराज पानसरे, रमेश शिंदे, जितेंद्र गायकवाड, सुरेश गायकवाड, प्रा. विजय चव्हाण, प्रा. श्रीकृष्ण तुपारे, प्रा. बबन झेंडे, रमेश शिंदे, जितेंद्र गायकवाड, विकास शिंदे, राजश्री दाभाडे, प्रभाकर ओव्हाळ, प्रकाश कांबळे, नरेश गायकवाड, किसन शिर्के, राजेश गायकवाड,संदीप मोहिते, प्रशिक बिनेदार, राजेश वाघमारे, रोशन पाटील, धम्मशील सावंत, सुरेंद्र शेलार, गायक संकेत कांबळे, नरेश जाधव, नितीन सोळंकी, अशोक भंडारी, शंकर जाधव, समीर जाधव, बाळा पाटील आदिसह भीम अनुयायी, धम्म बांधव उपस्थित होते.

# कर्जतच्या प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रातर्फे राज्याच्या शेतकऱ्यांसाठी भाताचे तीन वाण विकसित

कर्जत : जयेश जाधव

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या




मार्गदर्शनाखाली प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जतच्या भात विशेषज्ञ डॉ. भरत वाघमोडे आणि त्यांच्या चमूने अथक प्रयत्नातून विकसित केलेल्या कोकण संजय, कर्जत-१० आणि ट्रॉम्बे कोकण खारा या तीन विविध कालावधीच्या वैशिष्ट्यपूर्ण वाणांना राज्यस्तरीय वाण प्रसारण समितीने मान्यता दिल्यावर आज (ता.०२ऑगस्ट) केंद्रीय वाण प्रसारण समितीनेही अधिघोषित केल्याने विद्यापीठात आनंदाचे वातावरण पसरले आहे.ङ्ग कोकणातील तसेच राज्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांसाठी विविध गुण वैशिष्ट्ये असणाऱ्या या तिन्ही भात वाणांचे बियाणे पुढील हंगामापासून उपलब्ध करून देण्यात येतील,असे डॉ. भरत वाघमोडे यांनी सांगितले.या नूतन वाणांचे गुणवैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.ङ्गकोकण संजय:हा वाण निमगरवा (१२५ ते १३० दिवस ), लांबट बारीक दाण्याचा आणि ५० ते ५५ क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन देणारा आहे.प्रमुख कीड व रोगास मध्यम प्रतिकारक आहे.शिजवल्यानंतर तांदळाची गुणवत्ता उत्तम असून सदरचा वाण राज्यातील भात पिकविणाऱ्या विभागासाठी शिफारस करण्यात आला आहे.ङ्गकर्जत-१० : हा वाण गरवा (१४० ते १४५ दिवस ),४५ ते ५५ क्विंटल प्रती हेक्टरी उत्पादन देणारा आहे.हा वाण पाणथळ जमिनीसाठी शिफारस करण्यात आला आहे.प्रमुख कीड व रोगास मध्यम प्रतिकारक आहे.अख्ख्या तांदळाचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त असून शिजवल्यानंतर भाताची गुणवत्ता उत्तम आहे.ङ्गट्रॉम्बे कोकण खारा : हा वाण निमगरवा (१२५ ते १३० दिवस),लांबट बारीक दाण्याच्या प्रकारातील असून ४० ते ४५ क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन देणारा वाण आहे.कोकण विभागातील क्षारपड जमिनीसाठी याची शिफारस करण्यात आली असून ६ ईसी पर्यंत क्षार सहन करणारा हा वाण आहे.ङ्ग हे तिन्ही वाण भात पिकविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल, असे मत विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ रवींद्र मर्दाने यांनी व्यक्त केले आहे.

# दु:खात अजून एक भर

उत्तर प्रदेशातील बरेली या छोट्याशा शहरात लहानाची मोठी झालेली ती मुलगी आकाशातील विमान पाहून, इतर मुलांसारखी आनंदाने टाळ्या वाजवायची. पुढे तीच मुलगी विमानातील हवई सुंदरी बनते. दुर्दैवाने कोरोना काळात तिची नोकरी जाते. निराश झालेल्या याचिकाला आईची जुनी डायरी मिळते. त्या डायरीने तिच्या आयुष्याचा उद्योजिका म्हणून अध्याय लिहिला जातो. हा उद्योग अध्याय आहे-याचिका चोप्रा यांचा.

याचिका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढली. तिने बरेली येथील बिशप कॉनरॅड सीनियर सेकेंडरी स्कूलमध्ये १० वी पर्यंत शिक्षण घेतले. तिचे कुटुंब १९९९ मध्ये पुण्यात आले. तिने हचिंग्ज हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला, जिथे तिने २००१ मध्ये १२ वी पूर्ण केली. त्यानंतर तिने वाडिया कॉलेजमधून बी कॉम केले. त्यानंतर एका नावाजलेल्या शैक्षणिक संस्थेतून तिने मानव संसाधन (एचआर) विषयात एमबीए केले. पुढे तिने पुण्यातील एका वित्तीय कंपनीच्या एचआर विभागात सुमारे एक वर्ष काम केले.

काही काळानंतर याचिकाला तिची नोकरी नापसंत वाटू लागली. सदर नोकरी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीशी संबंधित होती. मात्र याचिकाला संप्रेषण आणि प्रशिक्षणाशी संबंधित काही तरी करण्यात स्वारस्य होते, जे एचआरमध्ये समाविष्ट होते; पण त्या तत्कालीन कंपनीमध्ये तिला करता येत नव्हते.

एके दिवशी २०११ मध्ये, भारतीय वाहतूक कंपनीमध्ये काम करणाऱ्या तिच्या मावशीने तिला एअर इंडियामध्ये हवाई सुंदरीच्या नोकरीसाठी मुलाखत देण्यास सांगितले. ती नोकरीसाठी एवढी काही उत्सुक नव्हती; पण एचआर नोकरीवर ती खूश नसल्यामुळे, तिच्या कुटुंबीयांनी तिला मुलाखतीस जायला सांगितले. दुर्दैवाने तिला एअर इंडियामध्ये नोकरी मिळाली नाही; परंतु तिला जेट एअरवेजमध्ये हवाई सुंदरी म्हणून नियुक्त करण्यात आले. तिथे तिने मुंबईत सुमारे एक वर्ष काम केले. २०११ मध्ये, ती दुबईमध्ये एमिरेट्समध्ये सामील झाली. ही नोकरी तिला खूप आवडली.

आलिशान हॉटेल्समध्ये राहणे, लॉस एंजेलीस आणि दुबईदरम्यान फ्लाइटमध्ये प्रवास करणे ही तिची दैनंदिनी होती. अनेक सेलिब्रिटी आणि उद्योजकांना भेटणे सहज शक्य असायचे. हे आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम क्षण होते, असे याचिकाला वाटते.

दरम्यान २०१९ मध्ये, तिने गोव्यात टूर आणि ट्रॅव्हल व्यवसाय चालवणाऱ्या रे वाझसोबत लग्न केले. २०१९च्या सरत्या वर्षात कोरोनाने जगभर थैमान घालण्यास सुरुवात केली. अवघ्या जगात लॉकडाऊन झाले. उद्योग डबघाईस आले. कित्येकांच्या नोकऱ्या गेल्या. पहिली कुऱ्हाड हवाई वाहतूक कर्मचाऱ्यांवर पडली. याचिका पण यातून सुटली नाही. ८ जुलै २०20 रोजी या महामारीच्या काळात तिला तिच्या नोकरीवरून काढून टाकण्यात आल्याची माहिती देणारा ई-मेल आला. त्यावेळी याचिका पतीसोबत गोव्यात राहत होती. ई-मेल वाचून तिला धक्काच बसला. आपल्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले, हे मान्य करायला तिला दोन-तीन दिवस लागले. या दुःखात अजून एक भर म्हणजे तिची आईसुद्धा निर्वतली. याचिका आतून पुरती तुटली होती. विश्रांती घेण्याची ही एक चांगली संधी आहे. असे सांगत याचिकाच्या पतीने तिला सावरण्याचा प्रयत्न केला. याच सुमारास गोव्यातील बारदेझ येथे घर साफ करत असताना, तिला तिच्या आईची जुनी डायरी सापडली, ज्यामध्ये लोणच्याच्या सर्व पाककृती होत्या. या पाककृतीचा वापर करत, तिने घरगुती लोणचे तयार केले.

तिच्या घरच्यांना लोणचे फार आवडले. आपण लोणच्याचा व्यवसाय सुरू केला तर तिच्या डोक्यात कल्पना आली. पतीने तिला प्रोत्साहन दिले. एप्रिल २०२१ मध्ये, गोव्यातील पर्वरी येथील तिच्या घरातून २०,००० रु. गुंतवून तिने लोणच्याचा व्यवसाय सुरू केला. तिने लोणच्यासाठी काही भांडी आणि साहित्य खरेदी करण्यासाठी हे पैसे गुंतवले आणि तिचे पहिले उत्पादन बनवले-मिरचीचे लोणचे. आपल्या ब्रँडला 'सीरका' असे नाव दिले. आज ती दर महिन्याला सुमारे १ लाख रुपये कमावते. याचिका घरूनच काम करते. सुरुवातीला याचिकाने इन्स्टाग्राम पेज सुरू केले आणि कुटुंबातील सदस्य आणि मित्रांना मोफत लोणचे देऊ केले.

''मला खात्री होती की, जर लोकांना ते आवडले, तर ते आणखी ऑर्डर करतील. ग्राहकांना आकर्षित करण्याची माझी रणनीती होती आणि ती कामी आली,'' याचिका सांगते. काही महिन्यांत विक्री हळूहळू वाढत गेली. लोक याचिकाच्या उपक्रमासाठी आणि चवदार लोणच्यासाठी तिचे कौतुक करत होते. शिवाय साहित्य खरेदी करण्यापासून ते बनवण्यापर्यंत आणि ऑर्डर पूर्ण करण्यासाठी ते पॅक करण्यापर्यंतच्या प्रत्येक कामाचा ती आनंद घेत होती. एका ग्राहक प्रदर्शनात तिला काही तासांत ६० जार विकण्यात यश आले, तेव्हा तिला मोठा ब्रेक मिळाला. हा तिच्यासाठी उत्साहवर्धक क्षण होता. त्यामुळे तिने लोणच्याच्या आणखी विविध प्रकारांवर प्रयोग करायला सुरुवात केली. याचिका आता आठ प्रकारचे लोणचे तयार करते. गाजर, मिरची, फ्लॉवर, वांगी, लसूण, आंबा, टोमॅटो आणि लिंबू. ते १०० ग्रॅम (१२५ रुपये किमतीचे) आणि २०० ग्रॅम (२७५ रुपये किमतीच्या) जारमध्ये येतात. ही सारी उत्पादने त्यांच्या वेबसाइटवर तसेच अमेझॉनवर उपलब्ध आहेत. पावसाळ्यात तिला अधिक ऑर्डर मिळतात. तिची उत्पादने सहा महिने ते एक वर्ष टिकू शकतात. सुरुवातीच्या काळात ग्राहक फोन आणि व्हॉट्सॲपद्वारे ऑर्डर देत असत. एक दिवस याचिकाच्या भावाने तिला कॉल केला की, त्याच्या एका सहकाऱ्याने ऑर्डर दिली नाही,

# प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सहयोगी संचालकपदी डॉ. बी. डी. वाघमोडे

कर्जत : येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सहयोगी संशोधन संचालकपदी वरिष्ठ भात पैदासकार आणि भात विशेषज्ञ डॉ. बी. डी. वाघमोडे यांची नियुक्ती ०१



ऑगस्ट पासून करण्यात आली आहे.ङ्ग डॉ. एस. बी. भगत हे नियत वयोमानानुसार दि. ३१ जुलै २४ रोजी सेवानिवृत्त झाल्याने ते सांभाळीत असलेल्या प्रभारी सहयोगी संशोधन संचालक या पदाचा अतिरिक्त पदभार दि. ०१ऑगस्ट २४ पासून डॉ. बी. डी. वाघमोडे यांच्याकडे सोपविण्याचे आदेश डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या मान्यतेने कुलसचिव डॉ. प्रदीप हळदवणेकर यांनी निर्गमित केले.ङ्ग डॉ. बी. डी. वाघमोडे हे मागील जवळपास साडे सत्तावीस वर्षांपासून संशोधन ,बीजोत्पादन ,विस्तार कार्य करीत आहेत.त्यांनी विविध पिकांचे २७ वाण विकसित केले आहेत.संशोधन कार्यातील बहुमूल्य कामगिरीमुळे त्यांना आतापर्यंत २१ प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. भात विशेषज्ञ म्हणून कर्जत येथे रुजू झाल्यापासून त्यांनी त्यांच्या विभागात बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या तसेच नवे प्रकल्पही सुरू केले आहेत.ते या संशोधन केंद्राचा कायापालट करतील,असा विश्वास व्यक्त केल्या जात असून डॉ. एस. बी. भगत, डॉ. रवींद्र मर्दाने,डॉ. नामदेव म्हसकर,डॉ. महेंद्र गवई,डॉ. विजय दामोधर,डॉ. विजय सागवेकर, डॉ. तुषार बेडसे तसेच नामांकित शास्त्रज्ञांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने अजित पवार यांचे राज्यातील सर्व जिल्हयात झंझावाती दौरे

**मुंबई :** हे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जनसन्मान यात्रेच्या निमित्ताने महायुती सरकारच्या लोककल्याणकारी योजना व महायुती सरकारने केलेले जनसेवेचे कार्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दौरा करणार असून या जनसन्मान यात्रेसाठी ७ समन्वयकांची तर ८ सहसमन्वयकांची यादी राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीर करण्यात आली आहे.जनसन्मान यात्रेसाठी समन्वयक म्हणून सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, कृषीमंत्री धनंजय मुंडे, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मारावबाबा आत्राम, महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे, क्रीडामंत्री संजय बनसोडे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील यांची तर सहसमन्वयक म्हणून आमदार राजेश विटेकर, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, राजेंद्र जैन, श्रीमती सुरेखाताई ठाकरे, सुरेश घुले,श्रीमती राजलक्ष्मी भोसले, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी आदींवर जबाबदारी देण्यात आली

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
मंगळवार ०६ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## तळा तालुक्यात महसूल सप्ताह निमित्ताने विविध कार्यक्रम व शिबीराचे आयोजन.

नागरीकांनी उपस्थिती दाखवून लाभ घ्यावा- तहसीलदार स्वाती पाटील.

(तळा कृष्णा भोसले) तळातालुक्यात महसूल सप्ताहानिमित्त १ ते १५ ऑगस्ट या कालावधीत विविध कार्यक्रम व शिबिराचे



आयोजन करण्यात आले आहे.शासनाने दि.१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत महसूल पंधरवडा साजरा करण्याचे निर्देश दिले असल्यामुळे तळा तालुक्यामध्ये तहसीलदार स्वाती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महसूल पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.ज्यामध्ये १ ऑगस्ट ''महसूल दिन साजरा करणे व महसूल पंधरवडा शुभारंभ'' ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना'' २ ऑगस्ट''मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना'' ३ ऑगस्ट ''मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना'' ४ ऑगस्ट ''स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय'' ५ ऑगस्ट ''कृषी मार्गदर्शन कार्यक्रम'' ६ ऑगस्ट ''शेती, पाऊस आणि दाखले'' ७ ऑगस्ट ''युवा संवाद'' ८ ऑगस्ट ''महसूल- जन संवाद'' ९ ऑगस्ट ''महसूल ई-प्रणाली'' १० ऑगस्ट ''सैनिक हो तुमच्यासाठी'' ११ ऑगस्ट ''आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन'' १२ ऑगस्ट ''एक हात मदतीचा- दिव्यांगांच्या कल्याणाचा'' १३ ऑगस्ट ''महसूल अधिकारी/ कर्मचारी'' यांचे प्रशिक्षण, १४ ऑगस्ट ''महसूल पंधरवडा वार्तालाप'' १५ ऑगस्ट '' महसूल संवर्गातील कार्यरत/ सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्कार वितरण'' व महसूल पंधरवडा सांगता समारंभ'' याप्रकारे कार्यक्रम पार पडणार असून तळा तालुक्यातील सर्व नागरीकांनी जास्तीत जास्त संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहून योजनेचा लाभ घ्यावा.असे आवाहन तळा तहसीलदार स्वाती पाटील यांनी केले आहे.

## तळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी नोंदणी करून घ्यावी.

तहसीलदार स्वाती पाटील यांचे आवाहन.

(तळा कृष्णा भोसले) तळा



तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपली ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करून घ्यावी असे आवाहन तळा तहसीलदार स्वाती पाटील यांनी केले आहे.केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार, दि.१ ऑगस्ट, २०२४ पासून, ई-पीक पाहणीचे कामकाज सुरु करण्यात आलेले असून तालुक्यातील शेतकऱ्यांनी दि.१ ऑगस्ट, २०२४ ते दि.१५ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत शेतकरी स्थरावर ई-पीक पहाणी करुन घ्यायची आहे. यासाठी सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या मोबाईलमध्ये ई-पीक पाहणी अॅप डाऊनलोड करुन घ्यावा.तसेच तळा तालुक्यात प्रत्येक गावासाठी एक सहाय्यकाची नेमणूक करण्यात आली असून, सदर सहाय्यक शेतकऱ्यांना ई-पीक पाहणीसाठी मदत करुन, ई-पीक पाहणी करताना शेतकरी बांधवांना येणाऱ्या अडचणी सोडविणार आहेत.ई-पीक पाहणी झाली नाही तर पीकविमा भात विक्री ई. योजनेच्या लाभापासून शेतकऱ्यांना वंचित रहावे लागेल. तरी शेतकऱ्यांनी मुदतीत पीक पाहणी करुन सदर योजनेचा लाभ घ्यावा व काही अडचणी असल्यास संबंधित तलाठी व नेमणूक केलेल्या सहाय्यक यांचेशी संपर्क साधावा.असे अवाहन तहसीलदार स्वाती पाटील यांनी केले आहे.

## मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये मुंडे महाविद्यालयाच्या विध्यार्थ्यांचे सुयश

मंडणगड(प्रतिनिधी)दि. : येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचालित लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विध्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या ५७ व्या



सांस्कृतिक युवा महोत्सवामध्ये उत्तर रत्नागिरी झोन नऊ च्या प्राथमिक फेरीमध्ये यश संपादन केले. सदर स्पर्धा आय. सी. एस. महाविद्यालय, खेड येथे संपन्न झाली. या विभागातून एकूण २० महाविध्यालायांनी विविध कलाप्रकारामध्ये सहभाग नोंदवला होता. ङ्गमहाविध्यालयातील विध्यार्थ्यांनी एकूण सात विविध कलाप्रकारात सहभाग नोंदवून त्यामध्ये व्दितीय वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थिनी कु. रितू खामकर हिने 'एकपात्री अभिनय' या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक संपादन केले. तर व्दितीय वर्ष कला वर्गातील विद्यार्थी समिउल्लाह बुरोंडकर या विद्याथ्र्याने 'कथाकथन' या स्पर्धेत तृतीय क्रमांचे पारितोषिक संपादन केले. या दोघांची विद्यापीठ स्तरावर होणा-या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व विद्याथ्र्यांना सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विष्णु जायभाये, डॉ. शामराव वाघमारे, डॉ. महेश कुलकर्णी तसेच श्री. युवराज बगाडे यांचे मार्गदर्शन लाभले. ङ्गयशस्वी विध्यार्थ्याचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री कर्मवीर दादा इदाते, संस्थाध्यक्षा सौ. संपदाताई पारकर, कार्याध्यक्ष श्री.श्रीराम इदाते, कार्यवाह प्रा. सतीश शेठ, सर्व संस्थापदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल जाधव, उपप्राचार्य डॉ. वाल्मिक परहर, सांस्कृतिक विभागचे समन्वयक डॉ. विष्णू जायभाये, डॉ. शामराव वाघमारे, डॉ. महेश कुलकर्णी, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# इमारतीच्या गॅलरीच्या स्लॅब कोसळला

नवी मुंबईतील कोपरखैरण येथे शनिवारी रात्री उशिरा पाच मजली इमारतीच्या गॅलरीचा स्लॅब कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यानंतर इमारतीत राहणाऱ्या सुमारे ७० लोकांना बाहेर काढण्यात आले. अधिकाऱ्याने सांगितले की, दोन कुटुंबांना मदत शिबिरांमध्ये पाठवण्यात आले आहे, तर इतरांना पर्यायी निवास व्यवस्था उपलब्ध करून दिली जात आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

इमारतीच्या बाल्कनीचा काही भाग कोसळला

मुसळधार पावसानंतर नवी मुंबईतील शाहबाज गावात बांधलेली तीन मजली इमारत अचानक कोसळली. या इमारतीत एकूण २४ कुटुंबे राहत होती. याआधी मुंबईतील ग्रँट रोड परिसरात इमारतीच्या बाल्कनीचा काही भाग कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला होता, तर चार जण जखमी झाले होते. ग्रँट रोड रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या रुबिनिसा मंझिल या चार मजली इमारतीत हा अपघात झाला.गुजरातमध्येही तीन मजली इमारत कोसळलीत्याचवेळी गुजरातमधील देवभूमी द्वारका जिल्ह्यातील जाम खंभलिया शहरात मुसळधार पावसात तीन मजली इमारत कोसळली. या अपघातात एका वृद्ध महिलेसह तिच्या दोन नातवंडांना आपला जीव गमवावा लागला. शहरातील गगवाणी फली परिसरात ही घटना घडली असून मध्यरात्रीपर्यंत सुमारे सहा तास चाललेल्या बचाव मोहिमेनंतर तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून पाच जणांची सुटका करण्यात आली आहे.

## संत रोहिदास तरुण मंडळ रजि. पुरस्कृत गोरेगांवचा राजा गणेशोत्सव साजरा करण्यास सज्ज

**गोरेगांव नगरी मध्ये घुमणार गोरेगांवच्या राजाचे जयघोष**

प्रतिनिधी चांदोरे माणगाव : नंदकुमार चांदोरकर

दि. ०५ ऑगस्ट २०२४, माणगांव तालुक्यातील गोरेगांव शहरात कार्यरत असलेले संत रोहिदास तरुण मंडळ रजि. पुरस्कृत गोरेगांवचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यंदा यशस्वी रित्या ३७ व्या वर्षात पदार्पण करित आहे. १२ बलुतेदार, १८ पकड जातींचे समावेश असलेले व वैशिष्ट्य म्हणजे सर्व मुस्लिम बांधवांना एकत्रित करून लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय एकोप्याचे निर्धाराने चालण्याचे सर्वोत्तम उदाहरण कायम करताना हे मंडळ आपल्याला नेहमीच दिसते. ङ्गङ्गस्त्री भ्रूण हत्या, पाणी प्रश्ण, २६/११ दहशतवादी हल्ला, ग्लोबल वॉर्मिंग, २००५ महापूर इ. असे समाजातील ज्वलंत विषयांवर विक्रमी देखावे साकारून रायगड जिल्हा नव्हे तर महाराष्ट्र राज्यातील अनेक स्पर्धेत भाग घेऊन आपले नावलौकिक ह्या मंडळाने कमावले आहे. रायगड जिल्हा पोलिस विभाग, झी २४ तास इकोफ्रेंडली गणराया, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण अशा विविध पुरस्काराने सन्मानित असलेला हा मंडळ, गणेशोत्सवात जेवढा जल्लोश साजरा करतो तेवढाच जोमाने सामाजिक पातळीवर सुद्धा कार्यरत आहे. रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, अतिवृष्टीला सामोरी गेलेल्या



नागरिकांना मदत कार्य इ. असे अनेक उपक्रम हे मंडळ वर्षभरात राबवते.

मंडळाच्या सर्व साधारण सभेत उत्सव कार्याध्यक्षपदी अक्षय सुनिल गोरेगांवकर, उपकार्याध्यक्षपदी रविंद्र हरिभाऊ मुंढे, सचिव वैभव सुनिल गोरेगांवकर, सहसचिव अभिषेक मारुती गोरेगांवकर, खजिनदार निकेश रमेश गोरेगांवकर, सहखजिनदार सौरभ सत्यवान चांदोरकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.ङ्गङ्गतसेच सदस्य पदी अमोल र. गोरेगांवकर, विनायक न.गोरेगांवकर, आदित्य र. गोरेगांवकर, राकेश भ. गोरेगांवकर, प्रसाद र. जाधव, मिहीर सं. गोरेगांवकर, कैलास हि. गोरेगांवकर, विष्णु ह. गोरेगांवकर, विशाल र. भुसकूटे, किशोर कृ. कापडेकर, महेंद्र गौ. म्हशेकर, ओमकार रा. गोरेगांवकर, केतन वि. गोरेगांवकर. तसेच सल्लागार नीलेश य. गोरेगांवकर, प्रसाद र. गोरेगांवकर, सचिन न. गोरेगांवकर, भारत वि. गोरेगांवकर, अशोक आंबेतकर, राम कृ. कापडेकर, चंद्रकांत वि. गोरेगांवकर, समीर च. गोरेगांवकर, महेंद्र पा. वायडे, उदय उ. गोरेगांवकर संतोष हि. गोरेगांवकर, उत्तम उ. गोरेगांवकर यांची सर्वानुमते नेमणूक करण्यात आली आहे.

## १५ ऑगस्ट रोजी गुहागर तहसीलदार कार्यालया समोर आबलोलीचे ग्रामस्थ आमरण उपोषणाला बसणार..!

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील आबलोली हे गाव आबलोली पंचक्रोशीतील महत्वाची बाजारपेठ म्हणून ओळखले जाते.

या गावात बँका, पतपेढया, शासकीय कार्यालये, शासकीय व खाजगी रुग्णालये तसेच मुख्य म्हणजे मच्छी मार्केट व भाजी मार्केट चिकन आणि मटन सेंटर मोठमोठी कापड व किराणा दुकाने आशा बाजारपेठेमुळे आणि वाहतुकीच्या सर्व सोयी व औषधोपचाराच्या सर्वसोयी उपलब्ध असल्या तरी अनेक गैरसोयी व शासकीय असुविधांमुळे अन्यायाविरुद्ध ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्यासाठी गुहागर तालुक्यातील आबलोली गावातील सर्व समाजातील सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन गावाच्या विकासासाठी पोस्ट १)ऑफीस आबलोली या मधील असुविधां बाबत.२) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी गुहागर,शाखा कार्यालय आबलोली बाबत.३) बँक ऑफ इंडिया शाखा आबलोली बाबत.४) भारत संचार निगम विभागा बाबत.५) सार्वजनिक



बांधकाम उपविभाग गुहागर बाबत .६) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ गुहागर आगार बाबत. ७) महसूल विभाग गुहागर बाबत. ८) जिल्हा परिषद आरोग्य विभागा बाबत गुरुवार दिनांक १५ ऑगस्ट ङ्ग२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता तहसीलदार कार्यालया समोर आबलोली गावातील ग्रामस्थ आमरण उपोषणाला बसणार आहेत.यामध्ये प्रामुख्याने निर्मल ग्रामपंचायत आबलोलीच्या सरपंच सौ.वैष्णवी नेटके, उपसरपंच श्री.अक्षय पागडे, ग्रामपंचायत सदस्य सौ.शैला पालशेतकर,सौ.पायल गोणबरे, सौ.रुपाली कदम,श्रीमती.नम्रता निमूणकर, ऋषिकेश बाईत,संजय कदम, ग्रामस्थ श्री.यशवंत पागडे,विद्याधर उर्फ अप्पा कदम,सचिन कारेकर, सचिन बाईत, महेंद्र कदम, प्रमेय आर्यमाने, सुभाष काजरोळकर, अनिकेत पागडे,अतिष भंडारी,संदेश काजरोळकर, तुकाराम पागडे, विजय पागडे,दिनेश भोसले,सौ.पुजा कारेकर, दिनेश शिंदे,प्रकाश कारेकर,विराज कारेकर, सुनिल महाडिक, रमेश नेटके,मोहन पागडे, राजेंद्र कारेकर, रोहन महाडिक,अमित करंजकर,सुमित पवार,सुजय पवार असे एकुण ३३ ग्रामस्थ आमरण उपोषणाला बसणार आहेत

छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय पत्ता : लक्ष्मण फकिरबा कांबळे छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी संभाजीनगर पत्ता पैठण रोड बेस्ट प्राईस कांचनवाडी डेंटल हॉस्पिटल जवळ (संपादक आवृत्ती), संपर्क : ९०२२६४३७७३ किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )